# लोकशाही

## प्र.२. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

### पार्श्वभूमी

**•१. लोकशाही ही संकल्पना कुठून अस्तित्वात आली?**

**उत्तर:** 'Democracy' हा शब्द ग्रीक भाषेतील, 'demos' म्हणजे 'लोक' आणि 'cratia' म्हणजे 'सत्ता' या दोन शब्दांवरून तयार झाला आहे. लोकशाही (Democracy) या संज्ञेचा शब्दश: अर्थ 'लोकांची सत्ता' असा आहे.

**•२. अब्राहम लिंकन यांची लोकशाहीची व्याख्या लिहा.**

**उत्तर:** अब्राहम लिंकन यांच्या मताप्रमाणे लोकशाहीची व्याख्या खालीलप्रमाणे:

"लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले सरकार म्हणजे लोकशाही."

**३. अराजक परिस्थिती असलेल्या समाजात हुकूमशाही कशी अस्तित्वात येते?**

**उत्तर:** समाजात निर्माण झालेल्या अराजकाचा फायदा एखादी प्रबळ व्यक्ती किंवा प्रबळ गट घेतो, तेव्हा त्या व्यक्तीची किंवा त्या गटाची हुकूमशाही अस्तित्वात येते.

## लोकशाहीची वैशिष्ट्ये

**४. लोकशाहीच्या बाबतीत कोणती बाब सर्वांत जास्त महत्त्वाची आहे?**

**उत्तर:** 'राज्यकर्ते लोकांनी निवडून दिलेले असतात', ही बाब लोकशाहीच्या बाबतीत अतिशय महत्त्वाची आहे.

**५. भारतीय लोकशाहीत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कोणाच्या हाती असतात?**

**उत्तर:** भारतीय लोकशाहीत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हाती असतात.

## लोकशाहीचे प्रकार

**६. लोकशाहीचे दोन प्रकार सांगा.**

**उत्तर:** लोकशाहीचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे:

i. प्रत्यक्ष लोकशाही

ii. अप्रत्यक्ष लोकशाही

***७. प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे काय? [मार्च १६]**

**उत्तर:** निर्णयप्रक्रियेमध्ये सर्व नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागावर आधारित असणारी लोकशाही म्हणजे 'प्रत्यक्ष लोकशाही' होय.

**८. अप्रत्यक्ष लोकशाहीचे दोन प्रकार लिहा.**

**उत्तर:** अप्रत्यक्ष लोकशाहीचे दोन प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

i. अध्यक्षीय लोकशाही ii. संसदीय लोकशाही

**९. स्वतंत्र भारताने कोणती शासनपद्धती स्वीकारली आहे? [मार्च १६]**

**उत्तर:** स्वतंत्र भारताने संसदीय लोकशाही ही शासनपद्धती स्वीकारली आहे.

**१०. अध्यक्षीय आणि संसदीय लोकशाही ज्या देशात अस्तित्वात आहे त्या देशांची नावे लिहा.**

**उत्तर:** संसदीय लोकशाही इंग्लंड आणि भारतामध्ये अस्तित्वात आहे, तर अमेरिका आणि फ्रान्समध्ये अध्यक्षीय लोकशाही आहे.

**११. प्रातिनिधिक लोकशाही म्हणजे काय? [मार्च १५]**

**उत्तर:** ज्या लोकशाहीमध्ये लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सरकार चालवितात, त्याला प्रातिनिधिक किंवा अप्रत्यक्ष लोकशाही म्हणतात.

**१२. अप्रत्यक्ष लोकशाहीतील मुख्य समस्या कोणती?**

**उत्तर:** अप्रत्यक्ष लोकशाहीमध्ये राजकीय घडामोडींमध्ये रस घेणारे किंवा राजकीय वा इतर प्रश्नांचा अभ्यास करणारे लोक फार थोडे असतात, ही अप्रत्यक्ष लोकशाहीतील मुख्य समस्या आहे.

***१३. प्रातिनिधिक लोकशाही अपरिहार्य का आहे? [मार्च १४, ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** मोठा भूप्रदेश, प्रचंड लोकसंख्या आणि गुंतागुंतीचे सार्वजनिक प्रश्न यांमुळे आधुनिक राज्यांमध्ये प्रातिनिधिक लोकशाही अपरिहार्य आहे.

**१४. संसदीय लोकशाहीमध्ये पंतप्रधानाला पदावरून मुदतीआधी कसे काढून टाकता येते?**

**उत्तर:** संसदीय लोकशाहीमध्ये पंतप्रधानावर अविश्वासाचा ठराव मांडून मुदतीआधी पदावरून काढून टाकता येते.

## जन सहभाग वाढविण्याचे आधुनिक काळातील मार्ग

**१५. ज्या दोन देशांनी लोकशाहीत जनतेच्या सहभागाचे मार्ग अवलंबिले आहेत त्या देशांची नावे सांगा.**

**उत्तर:** फ्रान्स आणि स्वित्झर्लंड या देशांनी लोकशाहीत जनतेच्या सहभागाचे मार्ग अवलंबिले आहेत.

***१६. प्रत्यावाहन म्हणजे काय? [जुलै १६]**

**उत्तर:** जर एखादा प्रतिनिधी आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडत नसेल, तर एकूण मतदारांपैकी विशिष्ट संख्येने लेखी विनंती केल्यास संबंधित प्रतिनिधीला परत बोलविता येते, यालाच प्रत्यावाहन असे म्हणतात.

***१७. सार्वमत केव्हा वापरले जाते? [मार्च १५]**

**उत्तर:** जनतेला निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी, एखाद्या महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यावर लोकमत आजमाविण्यासाठी सार्वमत ही पद्धत वापरली जाते.

**१८. 'जनपृच्छा' ही संज्ञा कोणत्या अर्थाने वापरली जाते?**

**[जुलै १५]**

**उत्तर:** कायदेमंडळाने संमत केलेल्या विधेयकावर जनतेची संमती घेणे या अर्थाने 'जनपृच्छा' ही संज्ञा वापरली जाते.

## प्र. ३. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

### लोकशाहीची वैशिष्ट्ये

**१. चीनमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही शासन नाही.**

**[मार्च १४]**

**उत्तर: बरोबर**

i. चीनमध्ये त्यांची संसद निवडण्यासाठी नियमितपणे दर ५ वर्षांनी निवडणुका होतात.

ii. परंतु, चीनच्या साम्यवादी पक्षाच्या सदस्यांनाच फक्त निवडणूक लढविण्याचे स्वातंत्र्य आहे.

iii. लोक जरी सत्ताधारी पक्षाविरुद्ध असले, तरी सत्ताधारी पक्षाचा पराभव कोणत्याही मार्गाने करू शकत नाहीत. अशा निवडणुका नि:पक्षपाती निवडणुका नाहीत.

त्यामुळे, चीनमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही शासन नाही.

**२. मेक्सिकोमध्ये २००० सालापर्यंत खरी लोकशाही नव्हती.**

**उत्तर: बरोबर**

i. १९३० मध्ये मेक्सिको स्वतंत्र झाल्यापासून दर सहा वर्षांनी अध्यक्षपदासाठी येथे निवडणुका होतात.

ii. परंतु, सन २००० पर्यंत प्रत्येक निवडणूक इन्स्टिट्यूशनल रिव्होल्यूशनरी पक्षच जिंकत आला.

iii. या पक्षाच्या दबावाखाली सरकारी अधिकारी, शिक्षक आणि प्रसारमाध्यमेसुद्धा लोकांना सत्ताधारी पक्षाला मतदान करण्यास दबाव आणत.

iv. त्यामुळे विरोधी पक्षांनी निवडणुका लढवूनही त्याचा उपयोग नव्हता.

म्हणून, २००० सालापर्यंत मेक्सिकोत खरी लोकशाही नव्हती.

***३. निवडणुका घेणे हे लोकशाहीच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे.**

**उत्तर: बरोबर**

i. लोकशाहीत प्रत्येक प्रौढ नागरिकाला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे.

ii. लोक आपल्या प्रतिनिधीला त्या ठरावीक काळापुरते निर्णय घेण्याचे हक्क देतात.

iii. देशात मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुका नसल्यास एखाद्या व्यक्तीची किंवा गटाची हुकूमशाही अस्तित्वात येऊ शकेल.

म्हणून, निवडणुका घेणे हे लोकशाहीच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे.

**४. लोकशाहीत अल्पसंख्यांकांचे हक्क फारसे महत्त्वाचे मानले जाऊ नयेत.**

**उत्तर: चूक**

i. लोकशाहीत सर्व नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा आदर केला जातो.

ii. कायद्यासमोर सर्व नागरिक समान असले पाहिजेत.

iii. लोकशाहीत जरी बहुसंख्यांकांची सत्ता असली तरी सरकारने अल्पसंख्यांकांच्या हक्काचा आदर केला पाहिजे आणि त्यांच्या संरक्षणाची खात्री दिली पाहिजे.

## लोकशाहीचे प्रकार

***५. भारतात अध्यक्षीय लोकशाही आहे. [जुलै १६]**

**उत्तर: चूक**

i. भारतात संसदीय लोकशाही आहे.

ii. संसदीय लोकशाहीत राष्ट्रपती हा केवळ नामधारी अध्यक्ष असून पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ हे प्रत्यक्ष सत्तेवर असतात.

iii. भारतातदेखील राष्ट्रपती हा केवळ नामधारी अध्यक्ष असून पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ हे प्रत्यक्ष सत्तेवर असतात.

**६. भारतात संसदीय लोकशाही आहे. [मार्च १६]**

**उत्तर: बरोबर**

प्र. ३ मधील प्र. ५ चे उत्तर पाहा.

**७. नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागावर आधारित असणारी लोकशाही म्हणजे अप्रत्यक्ष लोकशाही होय.**

**[ऑक्टोबर १४]**

**किंवा**

**प्रत्यक्ष लोकशाहीला प्रातिनिधिक लोकशाही असे सुद्धा म्हटले जाते.**

**उत्तर: चूक**

i. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये निर्णय प्रक्रियेमध्ये सर्व नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग असतो.

ii. अशा प्रकारच्या लोकशाहीमध्ये जनता खऱ्या अर्थाने सार्वभौम असते.

iii. परंतु, अप्रत्यक्ष लोकशाहीमध्ये लोकांची मते प्रत्यक्षपणे नव्हे, तर त्यांच्या निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत व्यक्त होत असतात.

iv. ज्या लोकशाहीत लोकांनी निवडलेले प्रतिनिधी सरकार चालवितात, त्याला प्रातिनिधिक किंवा अप्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात.

## जन सहभाग वाढविण्याचे आधुनिक काळातील मार्ग

***८. भारतात कायद्याचा प्रस्ताव मांडण्याची जबाबदारी कायदेमंडळाकडे आहे.**

**उत्तर: बरोबर**

i. भारतात संसदीय लोकशाही अस्तित्वात आहे.

ii. या लोकशाही पद्धतीत जनता आपले मत त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत व्यक्त करते.

iii. या प्रतिनिधींनाच अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार असतात.

त्यामुळे, भारतात कायद्याचा प्रस्ताव मांडण्याची जबाबदारी कायदेमंडळाकडे आहे.

९. **सार्वमत व जनपृच्छा यांच्या पद्धती समान असतात.**

**उत्तर: चूक**

i. जनतेला निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी एखाद्या महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यावर लोकमत आजमविण्यासाठी सार्वमत ही पद्धत वापरली जाते.

ii. तर, कायदेमंडळाने संमत केलेल्या विधेयकावर जनतेची संमती मिळविण्यासाठी जनपृच्छेचा वापर केला जातो.

म्हणून, सार्वमत व जनपृच्छा यांच्या पद्धती समान नसतात.

## प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० शब्दांत लिहा.

**पार्श्वभूमी**

१. **एखाद्या समाजात, हितसंबंधातील संघर्षामुळे कोणती परिस्थिती निर्माण होईल?**

**उत्तर:** i. एखाद्या समाजात, हितसंबंधातील संघर्षामुळे प्रत्येकजण त्रस्त होईल. त्या प्रदेशातील लोकांमध्ये शत्रुत्व, स्पर्धा आणि विवाद निर्माण होतील.

ii. प्रत्येकजण स्वत:च्या लाभ व हितसंबंधाचा विचार करू लागेल.

iii. अशा समाजात बलवान लोकांचे वर्चस्व वाढल्यामुळे 'बळी तो कान पिळी' अशी परिस्थिती निर्माण होईल.

iv. लोकांना अंतर्गत आणि बाह्य आक्रमणापासून संरक्षण मिळण्याची गरज भासू लागेल.

**२. सरकारी यंत्रणेची आवश्यकता का आहे?**

**उत्तर:** सरकारी यंत्रणेची आवश्यकता खालील बाबींसाठी आहे:

i. सर्वांच्या हिताचे नियम व कायदे ठरविण्यासाठी व त्यांच्या अंमलबजावणीसाठी.

ii. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी.

iii. बाह्य आक्रमणापासून संरक्षण मिळविण्यासाठी.

## लोकशाहीची वैशिष्ट्ये

**३. पाकिस्तानमधील लोकशाहीची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. पाकिस्तानात निवडणुका घेतल्या जात, मात्र तेथे शासन व्यवस्थेमध्ये, नागरी सत्ताधारी आणि लष्करी सत्ताधारी असे संमिश्र चित्र असते.

ii. निवडून आलेल्या प्रतिनिधींना काही अधिकार असतात; परंतु काही वेळा अंतिम निर्णय लष्करी अधिकारी घेतात.

iii. हे लष्करी अधिकारी लोकांनी निवडून दिलेले नसतात.

iv. त्यामुळे, पाकिस्तानात खऱ्या अर्थाने लोकशाही आहे असे म्हणता येत नाही.

**४. कम्युनिस्ट पोलंड आणि इराकमधील लोकशाहीची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. कम्युनिस्ट पोलंड व इराकमध्ये अनुक्रमे सोविएत रशिया व अमेरिका या बाह्य शक्तींचा प्रभाव होता.

ii. यामुळे खरी सत्ता ही बाह्य शक्तींच्या हातात होती, देशातून निवडून आलेल्या प्रतिनिधींकडे नव्हती.

iii. त्यामुळे, कम्युनिस्ट पोलंड आणि इराक या देशांत वरवर लोकशाही होती, परंतु खऱ्या अर्थाने लोकशाही होती असे म्हणता येत नाही.

**•५. 'जनतेचे सार्वभौमत्व' ही संज्ञा स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. लोकशाहीत जनता सार्वभौम असते म्हणजे जनता स्वतंत्र असते, जनतेवर दुसऱ्या कोणाचीही सत्ता नसते.

ii. खरी सत्ता जनतेच्या हातात असते व लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत जनता आपले सार्वभौमत्व अंमलात आणते.

**#६. लोकशाहीच्या अस्तित्वासाठी मुक्त आणि न्याय्य निवडणुका महत्त्वाच्या का आहेत?**

**उत्तर:** मुक्त आणि निकोप वातावरणामधील नि:पक्षपाती निवडणुका लोकशाहीच्या अस्तित्वासाठी गरजेच्या असतात; कारण

i. लोक जेव्हा निर्भयपणे, कोणताही दबाव नसताना निवडणुका लढवू शकतील तेव्हाच खरी लोकशाही अस्तित्वात येईल.

ii. लोकशाहीत निवडणुकांमार्फत सत्तेवर असलेल्यांना सत्तेवरून दूर करण्याची पुरेशी शक्यता असेल.

**#७. प्रौढ मताधिकार म्हणजे काय? तो आवश्यक का आहे?**

**उत्तर:** i. लोकशाही ही राजकीय समानतेच्या तत्त्वावर आधारलेली असते.

ii. सार्वत्रिक प्रौढ मताधिकारातून लोकशाही व्यक्त होते.

iii. 'प्रौढ मताधिकार' म्हणजे 'प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा समान अधिकार असला पाहिजे.'

iv. प्रौढ मताधिकार आवश्यक आहे कारण मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुकांसाठी याची मदत होते.

**८. एस्टोनिया आणि फिजी या देशांमध्ये सार्वत्रिक प्रौढ मताधिकार कसा नाकारला जातो?**

**उत्तर:** एस्टोनिया आणि फिजी या देशांमध्ये सार्वत्रिक प्रौढ मताधिकार खालीलप्रकारे नाकारला जातो:

**i. एस्टोनिया:**

एस्टोनियामध्ये नागरिकत्वाचे नियम असे तयार केले आहेत, की तेथे जे रशियन अल्पसंख्यांक आहेत, त्यांना मतदानाचा अधिकार मिळविणे अत्यंत कठीण जाते.

**ii. फिजी:**

फिजी देशात निवडणूक व्यवस्था अशी आहे, की तेथील स्थानिक फिजी व्यक्तीच्या मताचे मूल्य भारतीय फिजी व्यक्तीच्या मताच्या मूल्यापेक्षा जास्त असते.

***९. 'मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्याची जपणूक' यावर टीप लिहा.** **[मार्च १५]**

**उत्तर:** i. लोकशाहीत घटनेने प्रत्येक नागरिकाला काही मूलभूत अधिकार दिले आहेत.

ii. विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयात दाद मागण्याचे स्वातंत्र्य इत्यादी महत्त्वाची स्वातंत्र्येही दिली आहेत.

iii. वरील हक्क कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, कारण या हक्कांचे संरक्षण कायद्याने केलेले आहे.

iv. बहुसंख्यांकांची सत्ता असली, तरी सरकारने अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा आदर केला पाहिजे व त्यांच्या संरक्षणाची खात्री दिली पाहिजे.

v. अशा प्रकारे, लोकशाही शासन हे संविधान आणि नागरिकांचे हक्क यांच्या मर्यादेमध्ये राहून कार्य करत असते.

**१०. # लोकशाहीची वैशिष्ट्ये लिहा.**

**किंवा**

**लोकशाहीची प्रमुख वैशिष्ट्ये लिहा. [जुलै १५]**

**उत्तर:** लोकशाहीची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे:

i. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सत्तेवर असतात आणि त्या प्रतिनिधींना अंतिम निर्णयाचा अधिकार असतो.

ii. निवडणुका मुक्त आणि नि:पक्षपाती वातावरणात घेतल्या जातात.

iii. प्रौढ मताधिकार असतो आणि प्रत्येक मताचे मूल्य समान असते.

iv. लोकांचे मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्य यांची कायद्याने जपणूक केली जाते.

## लोकशाहीचे प्रकार

**११. ग्रीक आणि रोमन नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही का अस्तित्वात होती?**

**उत्तर:** i. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये निर्णयप्रक्रियेमध्ये सर्व नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग होता.

ii. ग्रीक व रोमन नगर राज्ये आकाराने लहान होती. स्त्रिया, गुलाम, परकीय इत्यादींना नागरिकत्वाचा दर्जा नसल्याने नागरिकांची संख्याही अतिशय कमी होती.

iii. आजच्या काळाइतके सार्वजनिक प्रश्नांचे स्वरूप गुंतागुंतीचे नव्हते. नागरिक परस्परांशी चर्चा करून, सल्लामसलतीने सार्वजनिक प्रश्न सहज सोडवित असत.

म्हणून, ग्रीक आणि रोमन नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती.

**१२. आधुनिक जगात प्रत्यक्ष लोकशाही अव्यवहार्य का ठरली आहे?**

**उत्तर:** i. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये निर्णय प्रक्रियेत जनतेचा प्रत्यक्ष सहभाग होता.

ii. म्हणजेच जनता खऱ्या अर्थाने सार्वभौम होती.

iii. आधुनिक काळात लोकसंख्येत वाढ झाली. यामुळे सार्वजनिक प्रश्नदेखील गुंतागुंतीचे बनले. निर्णय प्रक्रियेत सहभाग घेण्यात लोकांना वेळ व स्वारस्य उरले नाही.

त्यामुळे, प्रत्यक्ष लोकशाही अव्यवहार्य ठरली आहे.

***१३. 'अप्रत्यक्ष लोकशाही' म्हणजे काय?**

**उत्तर:** i. ज्या लोकशाहीत लोकांची मते प्रत्यक्षपणे नव्हे, तर त्यांच्या प्रतिनिधींमार्फत व्यक्त होतात, त्या लोकशाहीस 'अप्रत्यक्ष लोकशाही' म्हणतात.

ii. अप्रत्यक्ष लोकशाहीत लोकांनी निवडलेले प्रतिनिधी सरकार चालवितात, त्यामुळे तिला प्रातिनिधिक लोकशाही असेही म्हणतात.

iii. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स आणि भारत या देशांमध्ये अप्रत्यक्ष लोकशाही आढळून येते.

iv. अप्रत्यक्ष लोकशाहीचे अध्यक्षीय लोकशाही व संसदीय लोकशाही असे दोन प्रकार आहेत.

**१४. संसदीय लोकशाही पद्धतीची माहिती द्या.**

**उत्तर:** i. संसदीय लोकशाही हा अप्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार आहे. संसदीय लोकशाहीत सत्ता संसदेच्या हातात असते.

ii. संसदीय लोकशाहीत दोन कार्यकारी प्रमुख असतात. उदा.

अ. भारतातील राष्ट्रपती किंवा इंग्लंडचा राजा / राणी आणि

ब. पंतप्रधान.

iii. संसदीय लोकशाहीत पंतप्रधानाला अविश्वासाचा ठराव मांडून मुदतीआधी काढून टाकता येते.

**१५. अध्यक्षीय लोकशाही म्हणजे काय? कोणत्या देशांत ती कार्यरत आहे?**

**उत्तर:** i. अध्यक्षीय लोकशाही हा अप्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार असून यात कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांच्यात सत्तेचे विभाजन असते.

ii. अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष हा एकच कार्यकारी प्रमुख असतो.

iii. राष्ट्राध्यक्षांना मुदतीपूर्वी काढून टाकता येत नाही.

iv. अमेरिका आणि फ्रान्समध्ये अध्यक्षीय लोकशाही आहे.

## जन सहभाग वाढविण्याचे आधुनिक काळातील मार्ग

**१६. जन उपक्रम म्हणजे काय?**

**उत्तर :** i. नागरिकांनी कायद्याचा प्रस्ताव मांडणे याला जन उपक्रम असे म्हणतात.

ii. ठरावीक संख्येने नागरिकांनी असा प्रस्ताव दिला, तर कायदेमंडळाला त्याची दखल घ्यावीच लागते. अशी व्यवस्था काही देशांमध्ये असते.

iii. उदा. हा अधिकार स्वित्झर्लंडमधील नागरिकांना आहे.

***१७. आधुनिक काळात लोकांच्या सहभागासाठी कोणते मार्ग वापरता येतात?**

**उत्तर:** आधुनिक काळात लोक सहभागासाठी पुढील मार्ग वापरता येतात:

i. **प्रत्यावाहन:**
आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडत नसलेल्या प्रतिनिधीस विशिष्ट संख्येने लेखी विनंती केल्यास परत बोलावणे.

ii. **जन उपक्रम:**
यामध्ये नागरिक कायद्याचा प्रस्ताव मांडतात. काही देशांमध्ये अशी व्यवस्था आहे, की ठरावीक संख्येने नागरिकांनी प्रस्ताव दिला, तर कायदेमंडळाला त्याची दखल घ्यावीच लागते.

iii. **सार्वमत:**
सार्वजनिक प्रश्नांवर जनतेचे मत घेऊन मग निर्णय घेणे.

iv. **जनपृच्छा:**
या मार्गाचा वापर कायदेमंडळाने संमत केलेल्या विधेयकावर जनतेची संमती मिळविण्यासाठी केला जातो.